प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०१.१०.२०२१**

## सिडकोकडून नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या संस्थांस महिला मंडळाकरिता ४ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध

सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या नोंदणीकृत संस्थांस महिला मंडळाकरिता नवी मुंबईतील ४ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या योजनेतील एकूण ४ भूखंडांपैकी २ भूखंड हे नेरूळ नोडमध्ये तर उर्वरित २ भूखंड हे अनुक्रमे उलवे आणि १ भूखंड द्रोणागिरी नोडमध्ये उपलब्ध आहे.

**"नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या सर्वांगीण विकासास सिडकोने नेहमीच प्राधान्य दिले आहे. या योजने अंतर्गत महिला मंडळांकरिता भूखंड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महिला मंडळांकडून चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे प्रकल्पबाधित महिलांच्या सक्षमीकरणास मोठ्या प्रमाणावर हातभार लागणार आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडको महामंडळाकडून, नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासाकरिता सातत्याने विकास प्रकल्पांबरोबरच सामाजिक उद्देशांकरिताही भूखंड भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्यात येतात. सदर योजने अंतर्गत सेक्टर-२३ (दारावे), नेरूळ, सेक्टर-६ (सारसोळे), नेरूळ, सेक्टर-२, उलवे आणि सेक्टर-५२, द्रोणागिरी नोडमधील प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ४ भूखंड हे नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या नोंदणीकृत संस्थांना महिला मंडळांकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर भूखंड हे ७२.३८ चौ.मी. ते १९९.६१ चौ.मी. दरम्यानच्या क्षेत्रफळाचे आहेत.

सदर योजनेच्या योजना पुस्तिका २० सप्टेंबर २०२१ ते १४ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत, कार्यालयीन कामकाजांच्या वेळेत व दिवशी व्यवस्थापक (पुनर्वसन) यांचे कार्यालय, सिडको लि., सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक वाणिज्यिक संकुल, टॉवर क्र. ७, ७ वा मजला, नवी मुंबई - ४००६१४ या ठिकाणी विक्रीकरिता उपलब्ध आहेत.

---

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

जनसंपर्क विभाग, सिडको